# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.१८.०५.२०२३.

**आलोसे संजय कनिराम राठोड वय ५३ वर्षे, नाईक पोलीस कॉन्स्टेबल बनं. ७७२ नेमणुक पोस्टे मानोरा जि.वाशिम यांना ३०००/- रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | संजय कनिराम राठोड वय ५३ वर्षे, नाईक पोलीस कॉन्स्टेबल बनं.७७२, नेमणुक पोस्टे मानोरा जि.वाशिम रा.बालाजी नगर कारंजा लाड ता.जि.वाशिम |
| लाचेची रक्कम | ३०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार व त्यांचे वडीलांवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करता जमानतीवर सोडण्याठी. |
| सापळा अधिकारी | महेश किशोरराव भोसले, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

दि. १८.०५.२०२३ रोजी यातील तक्रारदार पुरुष वय २७ वर्ष व्यवसाय शेतमजुरी यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वर दि.२३/०४/२३ रोजी पोस्टे मानोरा येथे ३२४ भादंवी प्रमाणे गुन्हा दाखल झालेला असुन सदर गुन्हयामध्ये त्यांना व त्यांचे वडीलांना अटक न करता जमानत वर सोडण्याकरीता संबंधीत गावचे बिट जमादार असलेले आलोसे यांनी तक्रारदारास ३०००/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर तक्रारीवरुन पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे यांनी ३०००/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लगेच आज दि.१८.०५.२०२३ रोजीच आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदाराकडुन ३०००/- रु. लाचेची रक्कम पंच कं.१ यांचे समक्ष स्विकारल्याने, आलोसे यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरूध्द पोस्टे मानोरा येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कारवाई :- १.मा.,श्री.मारोती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती,
२.मा.श्री.अरूण सावंत अप्पर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती,
३. मा.श्री.देविदास घेवारे अप्पर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती,
४.मा.श्री. गजानन शेळके, पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम

यांचे मार्गदर्शनात महेश भोसले पोलीस निरीक्षक लाप्रवी वाशिम, अंमलदार पोहेकॉ विनोद मारकंडे , नितील टवलारकर, आसिफ शेख, विनोद अवगळे दुर्गादास जाधव, रवि घरत चालक नापोकॉ मिलींद चन्नकेशला यांनी पार पाडली.

कोणत्याही लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम, दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

(महेश भोसले) P.I
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.